SJIF Impact Factor - 5.67

E- ISSN 2582-5429

# AKSHARA

## Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

Augest 2022 Special Issue 06 Volume II (B)

### Department of Humanities Organises One Day National Conference

# Azadi Ka Amrit Mahotsava : A Glimpse

आज़ादी का अमृत महोत्सव



- Executive Editor -

**Prof.Dr. A.D. Goswami**

Vice-Principal & Head Department of Business Economics
Bhusawal Arts, Science & P. O. Nahata Commerce College, Bhusawal.

- Guest Editor -

**Dr. Mrs. Minakshi V. Waykole**

Principal,
Bhusawal Arts, Science & P. O. Nahata Commerce College, Bhusawal.

- Associate Editor -

**Dr. Prafull Ingole**
Head Department of History

**Mr. S. K. Rathod**
Head of Department Psychology

**Dr. Manoj Patil**
Department of Hindi

Bhusawal Arts, Science & P. O. Nahata Commerce College, Bhusawal.

Chief Editor : Dr. Girish S. Koli, AMRJ
For Details Visit To - www.aimrj.com

Akshara Publication

Scanned by CamScanner

E- ISSN 2582-5429

AMRJ

*Akshara Multidisciplinary Research Journal*

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

August 2022 Special Issue 06 Volume II (B) SJIF Impact- 5.67

# *Akshara Multidisciplinary Research Journal*

**Peer-Reviewed & Refereed International Research Journal**

**August 2022**

**Special Issue 06 Vol. II (B)**

Department of Humanaties Organises

One Day National Conference

# Azadi Ka Amrit Mahotsava : A Glimpse

**Executive Editor**

**Prof. Dr. A. D. Goswami,**

Vice - Principal & Head Dept. of Business Economics
Bhusawal Arts , Science and P. O. Nahata Commerce
College Bhusawal

**Guest Editor**

**Dr.Mrs . Minakshi V.Waykole**

Principal
Bhusawal Arts , Science and P. O. Nahata Commerce
College Bhusawal

**Associate Editors**

**Dr. Prafull Ingole**
Head Department of History

**Mr. S. K. Rathod**
Head Of Department Psychology

**Dr. Manoj Patil**
Department of Hindi

Bhusawal Arts , Science and P. O. Nahata Commerce College Bhusawal

**Organising Committee Members**

**Dr. S. V. Patil**
Vice-Prin.
**Dr.K.K.Ahire**
**Dr.P.A.Ahire**
**Prof.D.N.Patil**
**Prof.Purushottam Mahajan**
**Dr.Sachin Rajput**

**Prof. B. H. Barhate**
Vice-Prin.
**Dr.J.F.Patil**
**Prof.S.T.Dhum**
**Dr.R.S.Nadekar**
**Dr.Rajendra Tayade**
**Dr.Vitthal Kendre**
**Dr.Lalit Tayade**

**Mr. N. E. Bhangale**
Vice-Prin.
**Dr.S.P.Zanke**
**Prof.V.P.Ladhe**
**Dr.N.N.Zope**
**Dr.Dipak Shirsat**
**Mr. Jitendra Adokar**

*Akshara Publication*

Plot No 143 Professors colony,
Near Biyani School, Jamner Road, Bhusawal Dist Jalgaon Maharashtra 425201



Scanned by CamScanner

E- ISSN 2582-5429

AMRJ

**Akshara Multidisciplinary Research Journal**

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

August 2022 Special Issue 06 Volume II (B) SJIF Impact- 5.67

## Editorial Board

### -: Chief & Executive Editor:-

**Dr. Girish Shalik Koli**
Dongar Kathora
Tal.Yawal, Dist. Jalgaon [M. S.] India Pin Code: 425301
Mobile No: 09421682612
Website:www.aimrj.com Email:aimrj18@gmail.com

### -:Co-Editors :-

- **Dr. Sirojiddin Nurmatov,** Associate Professor, Tashkent Institute Of Oriental Studies, Tashkent City, Republic Of Uzbekistan
- **Dr.Vivek Mani Tripathi,** *Assistant Professor,* Faculty of Afro – Asian Languages and Cultures, Guangdong University of Foreign Studies, Guangzhou, Guangdong, China
- **Dr.Maxim Demchenko** Associate Professor Moscow State Linguistic University, Institute Of International Relationships, Moscow,Russia
- **Dr.Mohammed Abdraboo Ahmed Hasan,** Assistance Professor (English) The Republic of Yemen University of Abyan General manager of Educational affairs in University of Abyan ,Yemen.
- **Dr. Vijay Eknath Sonje,** *Assistant Professor* (Hindi) D. N. College, Faizpur [M. S.]
- **Mr. Nilesh SamadhanGuruchal,** *Assistant Professor* (English)Smt. P. K. Kotecha Mahila Mahavidyalaya, Bhusawal, Dist. Jalgaon [M. S.] India.
- **Dr. Shaikh Aafaq Anjum,** *Assistant Professor* (Urdu) Nutan Maratha College, Jalgaon. [M. S.] India.
- **Mr. Dipak Santosh Pawar,** *Assistant Professor* (Marathi)Dr. A.G.D. Bendale Mahila Mahavidyalya, Jalgaon [M. S.] India.

**AMRJ Disclaimer:**

***For the purity and authenticity of any statement or view expressed in any article. The concerned writers (of that article) will be held responsible. At any cost member of Akshara's editorial Board will not be responsible for anyconsequences arising from the exercise of Information contained in it.***



Scanned by CamScanner

E- ISSN 2582-5429

Akshara Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

August 2022 Special Issue 06 Volume II (B) SJIF Impact- 5.67

## Index


| Sr.No | Title of the Paper | Author's Name | Pg. No |
|---|---|---|---|
| 1 | भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार: एक दृष्टिक्षेप | प्रा.डॉ. विजय मांटे | 09 |
| 2 | लोकसंख्या विस्फोट भारतासाठी एक समस्या | डॉ.किरण अमृत वारके | 14 |
| 3 | Jotriao Phule's Critique of British Colonial Rule in India | Dr. Liladhar Shivajirao Patil | 17 |
| 4 | नंदुरबार जिल्हयातील सहकार क्षेत्राची चळवळ : एक दृष्टीक्षेप | प्रा.डॉ.अरुण उखा पाटील | 20 |
| 5 | भारतीय स्वातंत्र्यानंतर अर्थव्यवस्थेत पशुपालन व्यवसायाची भूमिका | अमोल श्रावण बावस्कर<br>प्रा.डॉ. ए.डी.गोस्वामी | 23 |
| 6 | विसाव्या शतकात महाराष्ट्रातील अंधश्रद्धा विषयक प्रबोधन कार्यात समाज सुधारकांचे योगदान | श्री भरत केवळ आहेर<br>प्रा.डॉ.संजय यशवंत गवळी | 26 |
| 7 | Kamala Das: A Woman's Voice in Post Independence Indian English Literature | Prof. Dr. Smita Sanjay Chaudhari | 30 |
| 8 | स्वातंत्र्य चळवळ आणि मराठी साहित्यानुबंध | डा. जितेंद्र शामसिंग गिरासे | 34 |
| 9 | आजादी के उपरान्त हिन्दी उपन्यासों में आदिवासी संघर्ष | डॉ. सविता काशिराम तायडे | 37 |
| 10 | स्वतंत्र भारत में मराठी संतों द्वारा हिंदी में प्रयुक्त विविध काव्य प्रकार | डॉ. मनोज नामदेव पाटील | 40 |
| 11 | आजादी के 75 वर्ष में बिरसा मुंडा का योगदान | प्रा. डॉ. पिरु गवली | 43 |
| 12 | भारतीय स्वातंत्र्य लढ्यात आदिवासींचे योगदान | दत्तात्रय पांडुरंग कातडे | 45 |
| 13 | महिलांच्या आर्थिक विकासात शिक्षणाचे महत्त्व :- विशेष संदर्भ नंदुरबार जिल्हा | डॉ.दिनेश जेरमा गावीत | 52 |
| 14 | भारतीय स्वातंत्र्य लढा पहिले व दुसरे जागतिक महायुद्ध आणि जळगाव जिल्हा | प्रा. डॉ. दीपक शिरसाट | 56 |
| 15 | संरचनात्मक बदलांची 75 वर्ष आणि भारतीय अर्थव्यवस्था | डॉ.विनोद आत्माराम नन्नवरे | 65 |
| 16 | लोकसंख्येचा विस्फोट | डॉ. संजय वसंत भामरे | 70 |
| 17 | भारतीय स्वातंत्र्य लढयात स्त्रियांची भूमिका | डॉ. शकुंतला एम. भारंबे | 75 |
| 18 | भारतीय शेती : अन्नधान्याची स्वयंपूर्णता स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर | प्रा.डॉ.विनोद झामा मोरे | 80 |
| 19 | स्वातंत्र्योत्तर काल के प्रवासी साहित्य में भारतीय दृष्टि | प्रा. डॉ. जगदीश बी. चव्हाण | 85 |
| 20 | भीष्म साहनी के उपन्यासों में चित्रित राजनैतिक पक्ष | प्रा. डॉ. कृष्णा प्रल्हाद पाटील | 88 |
| 21 | स्वातंत्र्योत्तर मराठी कवितेतील सामाजिक जाणीवा | डॉ. रामलाल चौधरी | 93 |




Scanned by CamScanner

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
August 2022 Special Issue 06 Volume II (B) SJIF Impact- 5.67


| | | | |
|---|---|---|---|
| 22 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रीय एकात्मता | प्रा. डॉ. सुषमा विश्वरत्न तायडे (अहिरे) | 97 |
| 23 | Depiction of Indian Freedom Struggle in Raja Rao's Kanthapura | Dr. Vitthal Ranba Kendre | 101 |
| 24 | स्वातंत्र्य पूर्व काळातील आणि उत्तर काळातील भारतीय शेती | प्रा.डॉ.वैशाली भिवसेन भिसे | 105 |
| 25 | भारतीय राजकारणासमोरील प्रमुख आव्हाने : एक अभ्यास | प्रा. अंबादास नरसिंगराव पाचंगे | 107 |
| 26 | Study of Corporate Social Responsibility in India | Amar Vasant Jawale | 110 |
| 27 | Depiction of the State of Women by Indian Women Writers in English | Dr. Hemangini M. Patil | 114 |
| 28 | Indian Women Novelists in English in Post-Inpendence Era | Dr. Jyoti L Dharmadhikari | 118 |
| 29 | भारताचा नियोजन कालीन विकास | डॉ.सचिन भास्कर कुंभार | 122 |
| 30 | Prominent Themes in The Literary Work of Post Colonial Indian English Women Writers | Kaustubh Pravin Patil<br>Kalyani Shivdayal Pande | 127 |
| 31 | Perspectives on "Punishment" in Gandhian Philosophy | Monalisa Saikia | 130 |
| 32 | भारतीय कृषी क्षेत्राच्या विकासाची ७५ वर्षे | निलेश रविंद्र कोळी<br>प्रा.डॉ. मनोजकुमार ज्योतिराम गायकवाड | 133 |
| 33 | लोकसंख्या विस्फोटाची कारणे व उपाययोजना: दृष्टीक्षेपात भारत | प्रा.डॉ. ललित निवृत्ती तायडे | 138 |
| 34 | Impact of Gandhian Thoughts in Raja Rao's Novel 'Kanthapura' with Special Reference to Indian Freedom Struggle | Prof.Yogeshwar D. Patil | 143 |
| 35 | भारतातील तृतीयपंथीयांचे शिक्षण: स्थिती आणि आव्हाने | प्रा. त्रिशिला जाधव साळवे<br>प्रा. डॉ.सुनील पराशराम पाटील | 147 |
| 36 | स्वातंत्र्यपूर्व काळातील आणि उत्तर काळातील भारतीय शेती | श्रीमती नीता अरुण पाटील | 152 |


Scanned by CamScanner

E- ISSN 2582-5429

AMRJ

Akshara Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

August 2022 Special Issue 06 Volume II (B) SJIF Impact- 5.67

32

# भारतीय कृषी क्षेत्राच्या विकासाची ७५ वर्षे

मार्गदर्शक

प्रा.डॉ. मनोजकुमार ज्योतिराम गायकवाड

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

वसंतराव नाईक कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शहादा जि-नंदुरबार.

संशोधक विद्यार्थी

निलेश रविंद्र कोळी

अर्थशास्त्र

**प्रस्तावना-(Introduction of Research)**

जागतिक भूक्षेत्रफळापैकी भारताच्या वाटेला २.४% भू-क्षेत्रफळ आलेले आहे. या क्षेत्रफळात सुमारे १२१ कोटी लोकसंख्या राहते. हि लोकसंख्या देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ६४.४% आहे. यासर्वांचे उदरनिर्वाहाचे साधन कृषी क्षेत्र आहे. कृषी क्षेत्र हे सर्वाधिक रोजगार पुरविणारे क्षेत्र आहे . तसेच स्थूल देशांतर्गत उत्पादनामध्ये कृषी क्षेत्राचा वाटा हा १९५०-५१ मध्ये ५५% इतका होता मात्र आज हा वाटा साधारण १६.५% इतका आहेत. हे घटते प्रमाण भारतीय अर्थव्यवस्थेसमोर नवीन आव्हाने उपस्थित करू शकते. परंतु कालानुरूप लोकसंख्येत सातत्याने होणाऱ्या बदलांमुळे भारतातील कृषी क्षेत्रात देखील तुकडीकरणाचा प्रभाव सातत्याने वाढताना दिसतो. भूधारण क्षेत्राचा घटता आकार आणि वाढत जाणारी लोकसंख्या आणि या वाढत्या लोकांची अन्न धान्याची वाढती गरज याचा मेळ बसने कठीण झाले आहे. परिणामी संपूर्ण देशात अन्न-धान्न तुटवडा तसेच बेरोजगारी, वाढत जाणारे दारिद्र्य ,उपासमार या समस्या निर्माण झालेल्या आहेत. आणि म्हणून मात्र या क्षेत्रातून मानवाच्या जीवनाविषयी विविध गरजा पूर्ण होत नसल्यामुळे इतर क्षेत्रात लोकांचे स्थलांतर वाढताना दिसते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने कृषीक्षेत्राच्या विकासकार्यासाठी विविध उपक्रम,नवीन कृषी धोरणे तसेच विविध योजनांची अंमलबजावणी केल्याचे आपल्याला दिसते. त्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थिती सुधारण्या बरोबरच कृषी उत्पादनात वाढ करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. आज कृषी क्षेत्र विकासाच्या दिशेने पुढे जात आहे. यासाठी सरकारने कृषी क्षेत्राच्या गरजेनुसार आजच्या स्थितीला बदल करणे गरजेचे ठरेल, तरच भारतीय कृषी प्रधान अर्थव्यवस्था विकसनशीलतेकडून विकसिततेकडे वेगाने वाटचाल करून विकसित होईल.

**उदिष्टे-(objective)**

१) भारतीय कृषी क्षेत्राच्या ७५ वर्षातील बदलांचा अभ्यास करणे.

२) भारतीय कृषी क्षेत्राची सध्य स्थिती अभ्यासणे.

**गृहीतके-(Hypothesis)**

१) भारतीय कृषी क्षेत्रात विकासात्मक बदल होत आहे.

२) भारतीय कृषी क्षेत्रांचा सध्या स्थितीत विकास झालेला नाही.

**संशोधन पद्धती-(Methodology of Research)**

सदर संशोधन निबंध मांडणी पूर्णतः दुय्यम साधन सामुग्रीच्या आधारे केलेली आहे,यात प्रामुख्याने शासनाचे अहवाल विविध, वर्तमानपत्रे, साप्ताहिके ,मासिके, त्रैमासिके, समाज विज्ञानकोश, प्रकाशित ग्रंथे चर्चा सत्रे, लेख, इंटरनेट इ. दुय्यम साधन सामुग्रीच्या आधारे संशोधकाने माहिती प्राप्त केलेली आहे.

**भारतातील पुरातन शेतीचे स्वरूप:-**

भारतीय शेतीचे १. स्थानिक परिस्थितीशी सुसंगत अशा काटक बियाणांचा वापर २. मातीचे स्वास्थ टिकवून ठेवणे आणि ३. शेतीतील जैवविविधता (विशेषत: पिकांची) असे तीन मुख्य आधार होते. या मजबूत पायावरच भारतीय शेती गेली साडेसहा हजार वर्षे टिकून राहिली. दक्षिण भारतात (महाराष्ट्रातील पूर्व विदर्भात देखील) गावपातळीवर तलाव राखल्या जाऊन त्यातून शेतीसाठी पाटाने पाणी देण्याची व्यवस्था होती. दर उन्हाळ्यात हंगाम संपल्यानंतर या तलावातील गाळ काढणे (व त्या सुपीक मातीचा शेतात वापर करणे) किंवा या तलावांच्या भिंतींची डागडुजी करणे ही कामे सामूहिक पद्धतीने केली जायची. जिथे फक्त कोरडवाहू शेतीच होऊ शकत होती अशाही ठिकाणी शेताभोवती झाडांच्या भिंती उभारून, म्हणजेच एक प्रकारे हवेतील आर्द्रता वाढवून, जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्याची पद्धत होती. अशा कोरडवाहू जमिनीत तसेच कमी पावसाच्या क्षेत्रात कोणती पिके घ्यावीत याचेही शास्त्र होते.

**इंग्रजकालीन भारतीय शेती :** भारतावर इंग्रज सत्तेचा अंमल होण्यापूर्वीच्या काळापर्यंत येथील खेडी शेती व्यवस्थापनाच्या बाबतीत स्वायत्त होती. शेतीत काय व कसे पिकवायचे आणि येणाऱ्या उत्पादनाचा विनियोग कसा करायचा याचे निर्णयस्वातंत्र्य शेतकऱ्यांना



Scanned by CamScanner

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
August 2022 Special Issue 06 Volume II (B) SJIF Impact- 5.67

होते. मुस्लीम राजवटीच्या काळातही ते अबाधित होते. इंग्रज राजवटीत मात्र शेतकऱ्यांच्या स्वायत्ततेवर बंधने आली. प्रथम ग्रामस्थांचा त्यांच्या गावातील जंगलावरच्या स्थानिक व्यवस्थापनाचा अधिकार हिरावून घेण्यात आला. जमिनीवरील शेतसारा, जो आधी पिकांच्या उत्पादनाच्या जवळपास ५ टक्के असे, तो भरमसाट म्हणजे ५० टक्क्यांपेक्षा ही जास्त वाढविण्यात आला. पीक येवो वा न येवो हा एवढा मोठा शेतसारा सरकारला देणे शेतकऱ्यांना अनिवार्य झाले. शेतकऱ्यांच्या अन्नविषयक गरजांची पूर्ती करणाऱ्या पिकांपेक्षा कापूस, नीळ, ऊस, भुईमूग अशा नगदी पिकांवर सरकारतर्फे भर देण्यात आला.इंग्रजांच्या या धोरणाची परिणती शेतकऱ्यांचे कंबरडे मोडण्यात व अन्नधान्याचे दुर्भिक्ष होण्यात झाली. इंग्रजांच्या राजवटीत या चुकीच्या धोरणामुळे जमीनदारांचा व सावकारांचा नवा वर्ग तयार झाला आणि शेतकऱ्यांच्या लुटीला सुरवात झाली. लोकांच्या जंगम संपत्तीवरील करही वाढल्यामुळे शेतकऱ्यांची विपन्नावस्था सुरु झाली व या काळात ग्रामीण भागातील गरिबीमुळे प्रचंड वाढ झाली. या सर्व बाबींमुळे देशाला स्वातंत्र्य मिळण्याच्या काळापर्यंत शेतीची पार दुरवस्था झाली. इंग्रज सत्तेच्या काळात जवळपास ११ मोठे दुष्काळ देशात येऊन गेलेत. मात्र धान्यनिर्मिती व धान्यवितरण या बाबतीतील सरकारच्या चुकीच्या व बेपर्वाईच्या धोरणांमुळे लाखो लोक मृत्यमुखी पडले.

**भूसुधारणा व शेती:-** जमीनदार, जहागिरदार, इनामदार इ. मध्यस्थ वर्गाचे उच्चाटन करणे, कसणाऱ्या कुळांना संरक्षण देणे व त्यां चे खंड कमी करणे, त्यांना जमिनीचे मालक किंवा कब्जेदार बनविणे, जमीनधारणावर कमाल मर्यादा घालून तिचे अधिक समान वाटप करणे,धारणाचे वेगवेगळे तुकडे एकत्र करणे आणि सहकारी शेतीला उत्तेजन देणे, असा विविध कार्यक्रम भूसुधारणांच्या कक्षेत येतो.

**शेतीचे नियोजन:-** भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारतीय कृषि तंत्र मागासलेले होते, जमिनीची उत्पादकता ही कमी होती, शेतकऱ्यांचे उत्पन्नही अल्प स्वरूपाचे होते. शेती उत्पादनात ही प्रतिवर्षी खूपच चढउतार होत असत. अन्नधान्याच्या बाबतीत जेमतेम स्वंयपूर्णता असण्या ऐवजी भारताला अन्नधान्यासाठी परावलंबी होण्याची पाळी आली. म्हणूनच सुरुवातीस नियोजन धोरणात कृषीला सर्वांत अधिक महत्त्व देण्यात आले. या प्रयत्नांना पहिल्या योजनेत चांगलेच यश मिळाले. एकूण कृषि उत्पादनाचा निर्देशांक १९५०-५१ मध्ये ९५·६ होता तो १९५५-५६ मध्ये ११६·८ पर्यंत वर गेला. दुसऱ्या योजनेत मूलभूत उद्योगांवर विशेष भर असला, तरी कृषीकडे दुर्लक्ष झाले असे म्हणता येत नाही. सिंचनाकडे विशेष लक्ष पुरवून सिंचन क्षेत्रात बरीच वाढ करण्यात आली, परंतु उत्पादनात हवी तेवढी वाढ झाली नाही. लोकसंख्या वाढल्याने धान्याची गरज एक सारखी वाढतच होती. तरीसुद्धा अन्नधान्य उत्पादनाचा निर्देशांक द्वितीय योजनेअखेर १३७·१ पर्यंत वाढला व एकूण कृषि उत्पादनाचा निर्देशांक दुसऱ्या योजनाकाळात ११६·८ वरून १४२·२ पर्यंत पोहोचला. याचे निम्मे श्रेय वहीत जमीन विस्ताराला दिले पाहिजे. तिसऱ्या योजनेत कृषिधोरण काहीसे बदलण्यात आले. १९६०-६१ मध्ये तीन जिल्ह्यांत सुरू केलेला सघन शेतीचा कार्यक्रम नंतर १३ जिल्ह्यांना लागू करण्यात आला. तरी सुद्धा कृषितंत्रात फारशी सुधारणा न झाल्यामुळे शेती उत्पादनात विशेष प्रगती झाली नाही. १९६५-६६ व १९६६-६७ या दोन वर्षांत अन्नपरिस्थिती आणखीच बिघडली. अवर्षणामुळे १९६५ च्या ८९ दशलक्ष टनांवरून अन्नधान्य-उत्पादन १९६६ मध्ये ७२ दशलक्ष टन व १९६७ मध्ये ७४ दशलक्ष टनांपर्यंत खाली आले. सुदैवाने याच सुमारास नवीन सुधारित बियाणे व खते यांच्या वाढत्या वापरामुळे कृषीमध्ये एक प्रकारची क्रांतीच (हरित क्रांती) घडून आली व भारत पुन्हा आपल्या पायावर उभा राहू शकण्याची चिन्हे दिसू लागली.

**कृषी क्षेत्रातील हरित क्रांतीचा काळ :-** भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राज्यकर्त्यांपुढे शेतीधोरण विषयक वेगळ्या प्रकारची आव्हाने होती. वाढलेल्या लोकसंख्येसाठी पुरेशा अन्न निर्मितीची समस्या तर होतीच शिवाय स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काही वर्षांमध्ये आलेल्या दुष्काळांची ही भर पडली. या पार्श्वभूमीवर सुरवातीच्या काळात धरण बांधणीला प्रोत्साहन देऊन व त्यातून सिंचनाच्या सोयी वाढवून, शेती शिक्षणाचा पाया विस्तृत करून, कृषी खात्याद्वारे गावांमध्ये शेती सुधारणेसाठी विस्तार कार्यक्रमाची मदत घेऊन, ग्रामीण भागात सेंद्रीय खत निर्मितीला प्रेरणा देऊन धान्य उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न झाले, परंतु या योजनांमुळे यश मिळण्याला बराच उशीर लागणार होता.

'हरितक्रांतीच्या' तंत्रज्ञानामध्ये जास्त उत्पादन देणारी उन्नत बियाणे, रासायनिक खते व रासायनिक कीटकनाशके अशा 'त्रिसूत्रीचा' समावेश होता. संकरीकरणाच्या तंत्राच्या सहाय्याने पिकांची हेक्टरी जास्त उत्पादन देणारी संकरित बियाणे तयार करण्यात आली. या तंत्रात एखाद्या पिकाच्या दोन किंवा जास्त वाणांमधील काही महत्त्वाचे गुणधर्म एकत्र आणून त्या पिकाचे नवीनच वाण तयार केल्या जाते (जसे जास्त उत्पादकता, पाण्याचा ताण सहन करण्याची ताकद, इत्यादी). परंतु हे गुणधर्म त्या नव्या वाणाच्या केवळ एकाच पिढीपुरते एकत्र राहत असल्यामुळे व त्यापुढील पिढीत ते पुन्हा वेगवेगळे होत असल्यामुळे शेतकऱ्यांना दरवर्षी बाजारातून त्या पिकाचे नवे संकरित वाण विकत घेणे आवश्यक झाले. आजघडीला भारतातील संकरित वाणांच्या बियाणांची



Scanned by CamScanner

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
August 2022 Special Issue 06 Volume II (B) SJIF Impact- 5.67

उलाढाल अंदाजे १२,५०० कोटी रुपयांच्या वर आहे व २०१८ सालापर्यंत ती १८,००० कोटी रुपयांच्या वर जाईल असा अंदाज होता. संकरित बियाणांच्या वापराआधी शेतकरी हंगामावर कापणीच्या वेळी आपल्या शेतातील पिकांमधून पुढील हंगामासाठी बियाणे गोळा करायचे. आता मात्र शेतकऱ्यांच्या माथी हा दरवर्षी बियाणे खरेदीचा भुर्दंड नव्याने बसला आहे. जास्त उत्पादन देणाऱ्या वाणाला पोषकद्रव्यांचा सहज पुरवठा व्हावा म्हणून नत्र, स्फुरद व पालाश हे पुरविणाऱ्या रासायनिक रासायनिक खतांचा उपयोग अनिवार्य झाला. 'हरितक्रांतीची' सुरवात प्रथम गहू व त्यानंतर तांदूळ या दोन महत्वाच्या धान्य पिकांपासून झाली. नंतर इतरही पिकांच्या बाबतीत या तंत्रज्ञानाचा अवलंब झाला. या तंत्रज्ञानाच्या मोठ्या प्रमाणावरील स्वीकारामुळे त्यानंतरच्या काळात भारतातील अन्नधान्याच्या उत्पादनात प्रचंड वाढ झाली यात शंकाच नाही.

**भारतीय कृषी उत्पादन:-** १९५० सुमारास अन्नधान्याचे एकूण वार्षिक उत्पादन ५ कोटी टन होते आणि माणशी उपलब्धता १४४ किलो इतकी होती. वाढत्या लोकसंख्येसाठी हे पुरेसे नव्हते आणि त्यामुळे आयातीवर अवलंबून राहण्या-शिवाय पर्याय नव्हता. १९६० च्या दशकात जास्त उत्पादन देणारे गव्हाचे आणि तांदळाचे सुधारित बीज मिळाले. २०२०-२१ या वर्षाच्या आकडेवारीनुसार अन्नधान्य उत्पादन ३० कोटी टनांपेक्षा जास्त आहे. तसेच अन्नधान्याची वार्षिक माणशी उपलब्धता १८७ किलो इतकी आहे. आज सरकारकडे असलेला अडीअडचणीसाठी ठेवलेला अन्नधान्याचा साठाही (बफर स्टॉक) ओसंडून वाहत आहे. कोव्हिड काळात देशातील सुमारे ८० कोटी लोकांना दरमहा मोफत ५ किलो धान्यपुरवठा ह्याच साठयातून होतो आहे.

शेतमालाची निर्यातही तुलनेने वाढली आहे. बासमती तांदूळ, साखर, मसाले आणि काही प्राणीजन्य पदार्थ ह्या आपल्या महत्वाच्या निर्यातीच्या वस्तू आहेत. कोव्हिड काळात म्हणजे २०१९-२० च्या लगेचच नंतरच्या काळात शेतमालाची निर्यात कोव्हिडपूर्व काळाच्या (२०१७-१८ आणि २०१८-१९) तुलनेत मोठ्या प्रमाणात वाढली. अनेक अविकसित आणि काही विकसित देशांमध्ये कोव्हिड काळातील अडचणींमुळे अन्नधान्याचा तुटवडा जाणवत असल्याने मोठ्या प्रमाणात भारतातून गहू, तांदूळ आणि इतर काही शेतमालाचा पुरवठा केला गेला. म्हणजेच आंतरराष्ट्रीय बाजाराशी आज आपले शेतकरी कुटुंब जोडले गेले आहे आणि देशांतर्गतच नाही, तर आंतरराष्ट्रीय मागणी शेती क्षेत्रातून पुरवली जात आहे.

**गेल्या ७५वर्षाची स्थिती :-** स्वातंत्र्योत्तर काळात भारतात पंचवार्षिक योजनांचे पर्व सुरू झाले. नियोजनबद्ध विकासाच्या प्रयत्नांमध्ये कृषीला भरपूर महत्त्व देणे आवश्यकच होते. कृषी वरील खर्चाचे प्रमाण जरी दर योजनेत बदलते असले, तरी तिच्या विकासाचे उद्दिष्ट नेहमीच योजनाकारांच्या दृष्टिसमोर होते. वेगवेगळ्या प्रयत्नांनी अन्नोत्पादन व इतर कृषिउत्पादन वाढविणे, हे अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी जरूर होते. वाढत्या लोकसंख्येस पुरेसे अन्न मिळणे, वाढत्या उद्योगधंद्यांना पुरेसा कच्चा माल मिळणे व वाढत्या रोजगाराबरोबर वाढत जाणारी अन्नधान्यांची मागणी पुरविता येणे, यांसाठी कृषिउत्पादन वाढविणे आवश्यक होते. त्यासाठी आवश्यक ते कायदे करण्यात आले. जमीनदार, जहागिरदार, इनामदार इ. मध्यस्थ वर्गाचे उच्चाटन, कसणाऱ्या कुळांना संरक्षण, जमिनीची मालकी किंवा कबजा मिळवून देणे, जमीनधारणेवर कमाल मर्यादा घालणे, वेगवेगळ्या तुकड्यांचे सांधीकरण करणे इ. बाबतींत कायदे करण्यात आले व त्यांचा फायदा काही प्रमाणात कृषिउत्पादन वाढण्यात झाला.पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांमध्ये जवळजवळ ३० लक्ष कुळांना २८ लक्ष हे. जमिनीची मालकी मिळाली व काही कुळे जमिनीची कबजेदार बनली. 'कसेल त्याची जमीन' हे तत्त्व अंमलात आल्याने जमिनीत सुधारणा होऊ लागली. १०८ लक्ष हे. जमिनीचे एकत्रीकरण-कायद्याने एकत्रीकरण झाले. पाणीपुरवठ्याकडे ही अधिक लक्ष पुरविण्यात येऊन नियोजनाच्या पहिल्या पंधरा वर्षांत पाण्याखालची जमीन सु. ७५ टक्क्यांनी वाढली. एकंदर सिंचित क्षेत्रात जी भर पडली, तीमुळे धान्योत्पादन वाढू शकले.गेल्या वीस वर्षांत सहकारी संस्थांतर्फे कृषीसाठी होणाऱ्या पतपुरवठ्यात कितीतरी भर पडली आहे. धान्योत्पादन वाढविण्यासाठी पहिल्या दोन योजनांत अधिक जमीन लागवडीखाली आणली गेली. त्यानंतर मात्र जमिनीचे दर हेक्टरी उत्पादन वाढविणे आवश्यक असल्याची जाणीव झाल्याने शेतकीचे तंत्र सुधारणे अपरिहार्य झाले. त्यासाठी विविध उपाय योजणे जरूर होते आणि हे प्रयत्न विस्तृत क्षेत्रावर विखुरण्या ऐवजी मर्यादित प्रदेशात एकत्रित स्वरूपाने करणे योग्य वाटले. म्हणूनच तिसऱ्या योजनाकाळात 'सघन शेतीचा कार्यक्रम'['इंटेन्सिव्ह ॲग्रिकल्चरल डिस्ट्रिक्ट्स् प्रोग्रॅम' (पॅकेज)], काही निवडक जिल्ह्यांमधून सुरू करण्यात आला. प्रथम काही वर्षे त्याचा अनुभव निराशाजनकच होता, कारण निवडलेल्या काही जिल्ह्यांत पाणीपुरवठा अनिश्चित होता. शिवाय सुरुवातीस या कार्यक्रमात खतांचा जादा प्रमाणावर उपयोग करण्याकडेच लक्ष पुरविण्यात आले. नंतर जेव्हा पिकांच्या अधिक उत्पादन देणाऱ्या जातींकडे विशेष लक्ष पुरविले जाऊन त्यांचे बी-बियाणे विस्तृत प्रमाणावर पुरविले गेले, तेव्हाच हा कार्यक्रम विशेष यशस्वी होऊ शकला. १९६६-६७ मध्ये अशा जातींचे बी मुबलक प्रमाणावर वाटण्यात आले व तेव्हापासून धान्योत्पादन वाढत जाऊन १९७०-७१ मध्ये १०.७८ कोटी टनांपर्यंत पोहोचले. याचाच अर्थ गेल्या वीस वर्षांत झालेली वाढ उल्लेखनीय आहे.

Scanned by CamScanner

E- ISSN 2582-5429

AMRJ

*Akshara Multidisciplinary Research Journal*

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

August 2022 Special Issue 06 Volume II (B) SJIF Impact- 5.67

भारतीय शेती क्षेत्राच्या उत्पादनात असंतुलन निर्माण झाले आहे. परिणामी निरनिराळ्या राज्यांच्या कृषिविकासातही असंतुलन आढळते. हे असंतुलन नाहीसे व्हावे, दर हेक्टरी उत्पादन व एकूण कृषिउत्पादन उच्च स्तरावर पोहोचून प्रतिवर्षी २.५ टक्क्यांनी वाढत जाणाऱ्या लोकसंख्येस पुरेसे व्हावे, म्हणून शेतीसुधारणेच्या प्रयत्नांवर विशेष भर दिला पाहिजे. खतांचा अधिकाधिक वापर, सुधारित बी-बियाणांची पेरणी, शक्य तेथे आधुनिक यंत्रांचा शेतीकामासाठी वापर, सहकारी संस्थांतर्फे पत इ. सुविधांचा विस्तृत प्रमाणावर पुरवठा व शेती बरोबरच दुग्ध व्यवसाय व कुक्कुट व्यवसाय यांचा विकास अशा मार्गांनी शेती व्यवस्थापनाचे आधुनिकीकरण शक्य झाल्यास कृषि उत्पादन राष्ट्रीय गरजांनुसार मुबलक व संतुलित होऊ शकेल. शेती आणि बिगरशेती क्षेत्रावर उपजीविकेसाठी अवलंबून असलेल्या व्यक्तींचे प्रमाण. १९५० च्या सुमारास एकूण काम करणाऱ्या लोकांपैकी ७० टक्के काम करणाऱ्या व्यक्ती शेतीमधील होत्या. यामध्ये हळूहळू घट होत गेली. परंतु तरीही अजूनही हे प्रमाण ५० टक्क्यांच्या आसपास आहे. अजून थोडेसे खोलात शिरून देशाच्या फक्त ग्रामीण भागाचा विचार केला तर एका अभ्यासानुसार २०११-१२ साली तेथील ६४ टक्के काम करणाऱ्या व्यक्ती शेतीमध्ये काम करत होत्या आणि उर्वरित ३६ टक्के काम करणाऱ्या व्यक्ती बिगरशेतीत होत्या. ह्यातील आश्चर्याची गोष्ट अशी की ग्रामीण भागातील ह्या ६४ टक्के व्यक्ती संपूर्ण ग्रामीण उत्पन्नाच्या ६४ टक्के नव्हे तर केवळ ३९ टक्के भागाची निर्मिती करत होत्या. शेतीक्षेत्रातील रोजगाराचे आणि उत्पन्नाचे हे व्यस्त प्रमाण शेतीची उत्पादकता कशी कमी आहे आणि त्यामुळे शेतीत काम करणाऱ्यांचे उत्पन्नही तुलनेने कसे कमी आहे ह्याचेच निदर्शक आहे. वर नमूद केल्याप्रमाणे स्वातंत्र्यानंतरच्या काळात शेतीउत्पादनामधे वाढ होऊ लागली. परंतु हे खरेच की शेती क्षेत्राच्या वाढीचा वार्षिक दर नेहमीच कमी म्हणजेच चार टक्क्याच्या खालीच राहिला. त्या तुलनेत उद्योगधंद्यांच्या आणि सेवाक्षेत्राच्या वाढीचा सरासरी दर मात्र ५ टक्क्यांहून जास्त होता. एखादी शेतीप्रधान अर्थव्यवस्था जशी वाढू लागते, जनतेचे उत्पन्न जसे वाढू लागते आणि अर्थव्यवस्थेचा विकास जसा होऊ लागतो तसे शेतीशी संबंधित क्षेत्रे आणि बिगरशेती उद्योगधंदे वाढू लागतात. शेतीमधील रोजगार निर्मितीला मर्यादा आहेत. त्यामुळे शेतीवर अवलंबून असलेली जनता हळूहळू वाढणाऱ्या इतर क्षेत्रांवर निर्वाहासाठी अवलंबून राहू लागते. ही वाढणारी क्षेत्रे म्हणजेच विविध वस्तूंचे उत्पादन करणारे उद्योगधंदे आणि विविध सेवा (जसे – बँकिंग, शिक्षण, मनोरंजन इत्यादी) पुरवणारे सेवाक्षेत्र. क्षेत्रांमध्ये रोजगार निर्मिती होऊ लागते आणि आणि त्यामुळे या क्षेत्रांचा एकूण राष्ट्रीय उत्पन्नामधील वाटाही वाढू लागतो. परंतु अशी रोजगार निर्मिती एखाद्या विकसनशील देशात पुरेशा प्रमाणावर झालीच नाही तर साहजिकच शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांना शेतीतून बाहेर पडून बिगरशेती क्षेत्रात रोजगाराची संधी मिळत नाही. अशा परिस्थितीमध्ये शेतीवर जरी तुलनेने जास्त जनता अवलंबून असली तरी राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा कमी असू शकतो. तसेच बिगरशेती क्षेत्रात काम करणाऱ्यांना शेतीपेक्षा मिळणारे सरासरी अधिक उत्पन्न आणि शेतीमधील जनतेचे तुलनेने निम्न स्तरावर असलेले जीवनमान अशी विचित्र परिस्थिती निर्माण होते. अशीच परिस्थिती आपल्याला भारतातही दिसून येते. रोजगारनिर्मितीच्या मंद वेगामुळे ग्रामीण भागातील जनतेला बिगरशेती क्षेत्राने मोठ्या प्रमाणावर सामावून घेतलेले नाही. त्यामुळेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (मनरेगा) हा ग्रामीण रोजगार निर्मितीचा कार्यक्रम आज अनेक कुटुंबांसाठी वर्षातील काही दिवस रोजगार पुरवीत आहे. त्यावर अनेक कुटुंबे भिस्त ठेवून आहेत. रोजगार निर्मितीतल्या अपयशा मुळे देशाच्या मनुष्यबळाची संरचना ही अजूनही शेती प्रधान राहिली आहे. कोव्हिड सारख्या नैसर्गिक आणि डीमॉनेटायझेशन सारख्या मानव निर्मित संकट कालीन परिस्थिती मध्ये अजूनही गावी माघारी येणाऱ्या जनतेचे भरणपोषण शेतीक्षेत्र करत आहे. म्हणूनच शेती क्षेत्राच्या आणि शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी बिगरशेती क्षेत्रात रोजगार निर्मिती करणे, विविध शेतीमाल प्रक्रिया उद्योगांना चालना देणे महत्त्वाचे आहे. अर्थव्यवस्थेच्या मनुष्यबळ संरचने व्यतिरिक्त ही शेती क्षेत्रासमोर प्रगतीच्या आड येणारी विशिष्ट अशी अनेक आव्हाने अजूनही आहेत.

**निष्कर्ष-(Conclusion)**

१) भारतातील लागवडी खालील शेतीपैकी जवळपास ६५ टक्के जमीन कोरडवाहू आहे. त्यामुळे आपल्या देशातील शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविताना विदेशी शेतीचे प्रारूप व तंत्रज्ञान जसेच्या तसे वापरून चालणार नाही.

२) संकरित बियाणे शेतकऱ्यांना दरवर्षी विकत घ्यावी लागत असल्यामुळे बियाणांच्या संदर्भात शेतकरी पूर्णपणे परावलंबी आहेत.

३) आधुनिक शेती उत्पादन व्यवस्था शेतकऱ्याच्या कौटुंबिक गरजांची पूर्तीपेक्षा बाजाराला हव्या असलेल्या गरजा पूर्ण करण्यावर भर देत आहे.

४) उदारीकरणाच्या धोरणाचा कृपी तंत्रज्ञान वापरात वाढ झाली, परंतु त्या पातळीवर ते दीर्घ काळ टिकून राहिले नाही.



Scanned by CamScanner

E- ISSN 2582-5429
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
August 2022 Special Issue 06 Volume II (B) SJIF Impact- 5.67

५) हरितक्रांतीमध्ये जास्त उत्पादन देणाऱ्या केवळ निवडक वाणांचाच प्रसार करण्यात आल्यामुळे पिकांची निसर्ग निर्मित अशी कितीतरी वाणे नष्ट झालीत.

६) २०१३ साली देशातील धान्य गोदामांमधील आपत्तीच्या काळासाठी राखून ठेवलेला अन्नसाठा ६ कोटी मेट्रिक टनाच्या वर गेला आहे.

७) १९५० च्या दरम्यान ५.२ कोटी मेट्रिक टनांच्या आसपास असलेले धान्योत्पादन २०१३ मध्ये २६.३ कोटी मेट्रिक टनांवर पोचले.

८) कोव्हिड काळात म्हणजे २०१९-२० च्या लगेचच नंतरच्या काळात शेतमालाची निर्यात कोव्हिडपूर्व काळाच्या (२०१७-१८ आणि २०१८-१९) तुलनेत मोठ्या प्रमाणात वाढली.

**उपाययोजना- (Suggestions)**

१) पारंपरिक पद्धतीने अनुदाने देऊन आणि हमीभावाचे धोरण राबवून शेतकऱ्याचे उत्पन्न टिकवून ठेवण्यासाठी संरक्षण मिळतेच. परंतु याशिवाय भविष्यातील प्रगतीसाठी शेतीमधील गुंतवणूक वाढविणे महत्त्वाचे आहे.

२) खाजगी व्यापार आणि सरकारी एकाधिकारशाही ह्या दोन्ही टोकाच्या विचारधारांना बाजूला ठेऊन व्यावहारिकदृष्ट्या अर्थपूर्ण अशी शेतीव्यापाराची मॉडेल्स उदयास येणे महत्त्वाचे आहे.

३) कृषिउत्पन्न बाजारसमित्यांसारख्या सरकारी संस्थांचे सबलीकरण आणि आधुनिकीकरण महत्त्वाचे आहे.

४) शेतीसंबंधित खाजगी अथवा सरकारी संस्थांकडून शेतकऱ्याला उत्तम सेवा मिळणे आवश्यक आहे. तसेच या संस्थांद्वारे शेतकरी कुटुंबाला प्रशिक्षण आणि कौशल्यविकास याद्वारे उद्यमशील बनवणे,

५) दर्जेदार शेतमालाचा पुरवठा होण्यासाठी प्रोत्साहन देणे, शेतमालासाठी जिथे देशांतर्गत आणि देशाबाहेर मागणी तिथे पुरवठा करण्यासाठी योग्य बाजार आणि बाजारभाव मिळवून देणे महत्त्वाचे आहे.

६) शेतकऱ्याकडून अंतिम ग्राहकापर्यंत शेतमाल पोहोचण्यासाठी पुरवठासाखळी मजबूत करणे आणि मालाच्या किमतीमध्ये कसणाऱ्याचा हिस्सा वाढवण्यासाठी आणि दलालांचा कमी करण्यासाठी व्यवस्था उभारणे आवश्यक आहे.

७) शेतीमालाच्या बाजारासंबंधी शेतकऱ्यांना सर्वंकष माहिती पुरवणे, माती परीक्षणापासून ते शेतकरी प्रशिक्षण आणि पिकाच्या विक्रीपर्यंत विविध बाबींसाठी नवीन तंत्रज्ञान आणि डिजिटल माध्यमांचा वापर करण्याची आणि या माध्यमांद्वारे जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याची गरज आहे.

८) शेतमाल प्रक्रिया उद्योग आणि विविध प्रकारच्या शेती कंपन्यांना, स्टार्टअप्सना आणि लघु कंपन्यांना तसेच शेतीबाहेरील रोजगार निर्मितीला पाठबळ देऊन त्याद्वारे शेतीवरील रोजगार निर्मितीचा भार कमी करून अर्थव्यवस्थेचा कणा बळकट करणे पुढील वाटचालीसाठी श्रेयस्कर ठरेल.

९) पारंपरिक पद्धतीने शेती करीत असताना भारतीय कृषी व्यवस्थेत सेंद्रिय खतांचा वापर उत्पादन वाढीसाठी केला जात आहे या सोबतच पुरातन शेती पद्धतीचा अवलंब केल्यास कृषी उत्पादन वाढेल.

१०) कृषी उत्पादनात वाढ होण्यासाठी दुसऱ्या हरित क्रांतीची आवश्यकता आहे.

**संदर्भसूची-(References)**

1. https://www.nitinsir.in/indian-agriculture
2. https://vishwakosh.marathi.gov.in/21415/
3. Government of India, Planning Commission, *Draft Outline of the Fourth Five-Year Plan*, 1969.
4. Randhawa, M. S. *Agriculture and Animal Husbandry in India*, New Delhi, 1958.
5. पटवर्धन, का. न. *दुर्जल कृषि पद्धति अथवा शास्त्रशुद्ध कोरडवाहू शेती*, पुणे, १९४३.
6. https://www.agrowon.com/mukhya-batamya/history-agriculture-india-after-independence-
7. https://mr.vikaspedia.in/agriculture/best-practices/sustainable-agriculture
8. https://www.sudharak.in/2022/07/8753/
9. https://maharashtratimes.com/editorial/samwad/self-sufficiency-in-food-grain-production-in
10. दत्त एव सुंदरम भारतीय अर्थव्यवस्था-गौरव दत्त,अश्विनी महाजन
11. कृषी विकासाचे अर्थशास्त्र,आव्हाने आणि उपाय-डॉ.रामेश्वर भिसे



Scanned by CamScanner